नियमीत दिवाणी दावा क्र. ४७१/२०२२ निशाणी क्र.५५ खाली

## प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. पी. पी. काळेगोरे यांच्यामार्फत प्र.सा.क्र.१ चा पुढील सर तपास शपथेवर सुरु

८. माझ्या साक्षीपुराव्याच्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर असून तो मला मान्य आहे. तसेच त्यावर माझी स्वाक्षरी आहे, ती मी ओळखतो.

९. मी माझ्या लेखी कैफियतीसोबत दिलेल्या कादगपत्रांच्या यादी नि.क्र.१५ वरील अ.क्र.१ वरील माझ्या जमिनीचा गाव नमुना क्र.८–अ चा उतारा दाखल केला आहे. त्यास **नि.क्र.५७** देण्यात येत आहे. तसेच अ.क्र.२ वर माझी जमीन गट क्र.३ च्या ७/१२ ची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.५८** देण्यात येत आहे. तसेच अ.क्र.३ वरील नियमीत दिवाणी दावा क्र.२३५/२०१४ मधील हुकुमनाम्याची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.५९** देण्यात येत आहे. तसेच माझी जमीन गट क्र.३ व ४ च्या टोच नकाशाची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. ती तीच आहे. त्यास यापूर्वीच नि.क्र.४० देण्यात आलेली आहे.

१०. तसेच मी कागदपत्रांची यादी नि.क्र.२४ बरोबर आणखी काही कागदपत्रे दाखल केले आहेत. त्यापैकी आता मला नियमीत दिवाणी दावा क्र.१६५/२००४ मधील तडजोड हुकुमनाम्याची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझा डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६०** देण्यात येत आहे. आता मला फेरफार क्र.३२२ दाखविण्यात आला. तो सार्वजनिक दस्त असल्याने त्यास **नि.क्र.६१** देण्यात येत आहे. आता मला माझ्या जमिनीचा गाव नमुना ८–अ दाखविण्यात आला. तो सार्वजनिक दस्त असल्याने त्यास **नि.क्र.६२** देण्यात येत आहे. मी माझ्या लेखी कैफियतीबरोबर नमुना क्र.९(३) आणि ९(४) चे फॉर्म दाखल केले आहेत. ते मला आता दाखविण्यात आले. ते सार्वजनिक दस्त असल्याने त्यास अनुक्रमे **नि.क्र.६३ व ६४** देण्यात येत आहे.

पुढील सर तपास संपला.

## वादींतर्फे विधीज्ञ श्री. पी. एम. सूर्यवंशी यांच्यामार्फत प्र.सा.क्र.१ चा उलट तपास

११. मी अशिक्षित आहे. माझे पती हयात आहेत. ते स्वतः धरुन तीघे भाऊ आहेत. माझ्या सासऱ्यांचे नाव दगडू आहे. त्यांना मौजे एकुर्का रोड या गावात एकूण किती

जमिनी होत्या, हे मला निश्चित सांगता येत नाही.

१२. सर्वे क्र.६ चे किती गट पडले, हे मी सांगू शकत नाही. तसेच सर्वे क्र.१ चे किती गट पडले, हे मी सांगू शकत नाही. सदर दोन्हीही सर्वे क्रमांकामध्ये माझ्या सासऱ्यांना अंदाजे ३२ ते ३३ एकर जमीन होती. माझ्या सासऱ्यांना सदर दोन सर्वे क्रमांकामध्ये ३२ ते ३३ एकर जमीन असल्याबाबत मी कोणताही दस्त अभिलेखावर दाखल करु शकत नाही. सर्वे क्र.३ मध्ये आमच्या पतीला तसेच दीराला किती जमीन आली, हे मी सांगू शकते. सर्वे क्र.३ मध्ये माझ्या पतीला ७१ गुंठे तसेच दीर बालाजी यांना ३ एकर २२ गुंठे आणि मयत दीर तानाजी यांच्या पत्नीला १० एकर २५ गुंठे जमीन आली होती.

१३. गट क्र.३ चा पूर्वी किती सर्वे क्रमांक होता, हे मी सांगू शकत नाही. वादीचा मूळ सर्वे क्र.७ होता किंवा कसे, हे मला माहिती नाही. तसेच सदर मिळकत ही त्यांची वडिलोपार्जित आहे किंवा कसे, हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमची सर्वे क्र.६ व १ मधून आलेली जमीन ही वडिलोपार्जित आहे. आमच्या गट क्र.३ मधील जमिनीमधून महामार्ग गेल्याबाबत मी कोणतेही कागदपत्र पाहिलेले नाहीत. आमची जमीन महामार्गासाठी संपादित केल्याबाबत किंवा त्याचा मावेजा मिळाल्याबाबत मला काहीही माहिती नाही.

१४. माझ्या गट क्र.३ चा हिस्सा नमुना क्र.४ मी दाखल करु शकते. गट क्र.३ च्या बाजूने राजुरी पाणंद रस्ता गेला आहे किंवा कसे, हे मला माहिती नाही. साक्षीदार स्वतःहून सांगते की, तो नांदेड–बीदर महामार्ग आहे. नांदेड–बीदर महामार्ग गट क्र.४ मधून गेला आहे किंवा ३ मधून गेला आहे, हे मी सांगू शकत नाही. आमच्या गट क्र.३ च्या बाजूने नांदेड बीदर महामार्ग गेल्याबाबत मी कोणतेही कागदपत्र अभिलेखावर दाखल करु शकत नाही. गट क्र.३ चे एकूण क्षेत्रफळ किती आहे, हे मी सांगू शकत नाही.

१५. सर्वे क्र.७ चे किती गट पडले, हे मी सांगू शकत नाही. वादीच्या नामे गट क्र.४ व ६ ची मिळून एकूण २० गुंठे जमीन आहे किंवा कसे, हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीने आमच्याविरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्याप्रमाणे वाढवणा पोलिसांनी आमच्यावर भा.ना.सु.सं. कलम १६४ प्रमाणे कारवाई केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही वादीच्या ताब्यास वारंवार हरकत हडथळा करत असल्याने पोलिसांनी आमच्याविरुद्ध भा.ना.सु.सं. कलम १६४ प्रमाणे कारवाई केली आहे.

१६.     हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीवरील वादीच्या ताब्यास आम्ही सतत हरकत अडथळा करत आहोत. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीशी आमचा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीच्या पश्चिमेकडून नांदेड–बीदर महामार्ग जातो. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीच्या पूर्वेस आणि दक्षिणेस आमची मिळकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला. फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by BHALCHANDRA RAWSAHEB ZENDE
Date: 2026.04.06 17:30:06 +0530

(भालचंद्र रा. झेंडे)

दिनांक : ०६.०४.२०२६

३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)
उदगीर.